# प्रेस नोट

## औद्योगिक परिसारामधील कंपन्यांमध्ये घरफ़ोडया करुन ताब्याची चो-या करणारी आंतरराज्यीय टोळी चिखली पोलीसांकडुन जेरबंद

---

पिंपरी चिंचवड आय्क्तालयातीला औद्योगिक परिसरामध्ये अनेक वर्कशॉप, स्मॉल इंडस्ट्रीज असे अनेक लहान मोठे व्यवसाय करणारे व्यावसायिक आहेत. गेले काही दिवसांपासुन औदयोगिक परिसरामध्ये चो-यांचे प्रमाण वाढले होते. त्याला प्रतिबंध करण्याचे दृष्टीने चिखली पोलीस स्टेशनकडील तपास पथकांमार्फत रात्रौचे वेळी पेट्रोलिंग नेमण्यात आली असुन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याचे दृष्टीने चिखली पोलीस स्टेशन मार्फत वेळोवेळी ट्रॅप लावण्यात आले होते.

वाढत्या घरफ़ोड्याचे प्रमाण विचारात घेऊन चिखली पोलीस स्टेशनचे वरीष्ट पोलीस निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर काटकर यांनी सहा. पोलीस निरीक्षक तोफ़िक सय्यद याच्या नेतृत्वाखाली एक पथक स्थापन करुन त्याच्यावर ही जबाबदारी सोपविलेली होती. सदरच्या पथकाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयात घडलेल्या घरफ़ोडीचे गुन्हयाचे सिसिटिव्ही फ़ुटेज प्राप्त करुन घेऊन त्याचा अभ्यास केला असता म्हाळुंगे, दिघी तसेच चिखली पोलीस स्टेशन हद्दीत झालेल्या घड़फ़ोडीचे गुन्हे करणारे आरोपी एकच असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानुसार त्यांनी पुढे तपास करुन आरोपीचा मागोवा घेण्यास सुरवात केली . गुन्हाचे ठिकाणी आरोपीचा येण्याचा मार्ग व परत जातानाचा मार्ग तसेच त्यांनी वापरलेली वाहने याबाबतचा तपास आरोपीचा म्हाळुंगे, दिघी तसेच चिखली परीसरातील घरफ़ोडीच्या ठिकाणापासुनच्या सर्व रस्त्यावरील सिसिटिव्ही फ़ुटेजची तपासणी करण्यात आली.

तपासांअती आरोपी हे गुन्हा करत असताना दोन मोटरसायकल वरुन येत असुन चोरी केलेला माल एका टेम्पोने नेत असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. सिसिटिव्ही चे फ़ुटेज तसेच परीसराचा डम्प डाटा काढुन त्याचे तात्रीक विश्लेषण केले असता ठराविक फ़ोन नंबर हे गुन्हा घडताना घटनास्थळाचे परीसरातच असल्याचे त्यांचे लक्षात आले. तांत्रीक तपासावरुन आरोपी नामे १) अब्दुलकलाम रहिमान शहा वय २३ वर्षे, राह.ऑरेंज हॉस्पीटलचे मागे, कुदळवाडी, चिखली पुणे, मुळ राह.सिंहोरवा, पो.कडजा, थाणा खेंसजहा, जि.नवगड, राज्य उत्तरप्रदेश हयास अंगणवाडी चौक, चिखली परीसरात चोरीचा माल विक्रीस घेऊन येत असताना पोलीसांनी ताब्यात घेतले.

त्याच्याकडे अधिक तपास करता त्याने त्याचे साथीदार नामे १)योगेश तानाजी चांदणे वय २६ वर्षे, धंदा ड्रायव्हर राह.बोल्हाईचामळा, गल्ली नंबर १०, जाधववाडी, चिखली, पुणे मुळ राह. मु.पो.भोसर, कुर्डुवाडी, ता.माढा, जि.सोलापुर २) रविशंकर महावीर चौरासिया वय २३ वर्षे, राह.बिराजदार यांची रुम, पाटीनगर, मोई गाव, ता.खेड, जि.पुणे, मुळ राह. ग्राम कमसार, ता.इटवा, थाना त्रिलोकपुर, जि.सिध्दार्थनगर राज्य उत्तरप्रदेश, ३) रिझवान खान, ४) शकील मन्सुरी व दोन विधीसंघर्षग्रस्त बालक या सर्वांनी मिळुन चो-या केल्या असल्याचे सांगुन चोरीतील माल नेण्यासाठी योगेश चांदणे याचा टेम्पो नंबर एम.एच.१४.के क्यू.८२९६ याचा वापर केल्याचे सांगितले. त्याप्रमाणे आरोपी नामे योगेश तानाजी चांदणे व रविशंकर महावीर चौरासिया यांना त्यांचे ताब्यातील टेम्पोसह लागलीच शिताफीने ताब्यात घेवुन अटक करण्यात आली. तसेच त्याच्या ताब्यात घरफ़ोडी करण्यासाठी त्यांनी वापरलेले ग्राइंडर मशीन, पोपट पाना, चार्जेबल टयुब लाईट, ब्युटेन गॅस गन, लोखंडी छन्न्या, कु-हाडीचे पाते, ड्रिलमशीन, स्टील बोल्ड कटर, हॅक्सा फ्रेम, टी पाना, स्क्रु ड्रायव्हर, हातोडा असे घरफोडीसाठी लागणारे साहित्य मिळुन आले.

अटक आरोपीनी तपासादरम्यान पुणे जिल्हयामध्ये त्यांनी गुन्हे केल्याचे ठिकाण दर्शविले त्यानुसार पुढीलप्रमाणे गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

१) **चिखली पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ६८८/२०२३, भादवी कलम ४५७, ३८० प्रमाणे**
२) **चिखली पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ६७४/२०२३, भादवी कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे**
३) **चिखली पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ६२९/२०२३, भादवी कलम ४६१, ३८० प्रमाणे**
४) **दिघी पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ५६३/२०२३ भादवी कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे**
५) **चाकण पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ७९९/२०२३ भादवी कलम ३७९ प्रमाणे**
६) **चाकण पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ७४२/२०२३, भादवी कलम ४६१, ३८० प्रमाणे**
७) **कोंढवा पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. ११८९/२०२३, भादवी कलम ४५४, ४५७,३८० प्रमाणे**
८) **भारती विद्यापिठ पो.ठाणे गु.रजि.नं. ७७५/२०२३, भादवी कलम ३७९ प्रमाणे**

अश्या प्रकारे वरील प्रमाणे **रु. ५२,६५,९५८/-** चे घरफ़ोडीचे गुन्हे उघड करण्यात आलेले असुन अटक आरोपीकडून **रु. २४,४५,१४०/-** किमतीचा मुद्देमाल अदयापर्यन्त हस्तगत करण्यात आलेला आहे.

अटक आरोपी व पाहिजे आरोपी हे मुळचे उत्तर प्रदेशातील रहिवासी असुन त्यांनी लहान मुलाचा समावेश असणारी एक गुन्हेगारी टोळी त्यानी निर्माण केलेली असुन ते टोळीने पुणे शहरात येतात. एक ठिकाणी खोली भाड्याने घेऊन राहतात व रेकी

करुन रात्रीच्या वेळेस बंद असणा-या कंपन्यामध्ये रात्रीच्या घरफ़ोडया करुन ताब्याचा माल चोरत असल्याचे तपासात निष्पन्न झालेले आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.संदीप डोईफोडे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-३, पिंपरी चिंचवड, मा. श्री. विवेक मुगळीकर, सहा.पोलीस आयुक्त, भोसरी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली मा. श्री. ज्ञानेश्वर काटकर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, चिखली पोलीस स्टेशन यांचे अधिपत्याखाली गुन्हे प्रगटीकरणे शाखेचे सपोनि/श्री.तौफिक सय्यद, पोहवा/बाबा गर्जे, पोहवा/ सुनिल शिंदे, पोहवा/ चेतन सावंत, पोहवा/विश्वास नाणेकर, पोहवा/ भास्कर तारळकर, पोहवा/संदिप मासाळ, पोहवा/ दिपक मोहिते, पोना/अमर कांबळे, पोना/ कबीर पिंजारी, पोशि/ संतोष सकपाळ, पोशि/संतोष भोर यांनी यशस्वी रित्या पार पाडली आहे.

(संदिप डोईफ़ोडे)
पोलीस उप आयुक्त,
परीमंडळ-३,पिंपरी चिचवड